# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

प्रेस नोट क्र-१००/२०२५ दिनांक- २८/०२/२०२५

## प्रेस नोट

### नयानगर पोलीस ठाण्याकडुन रमजान सणाच्या पार्श्वभुमीवर शांतता कमिटी, मोहल्ला कमिटी, मस्जिद मदरसा, ट्रस्टी मौलाना, प्रतिष्ठीत नागरीक यांची बैठक घेवुन सदरचा सण शांततेत पार पाडण्याचे आवाहन

दिनांक ०१.०३.२०२५ पासुन मुस्लिम बांधवाच्या पवित्र रमजान महीन्याची सुरुवात होत असुन दिनांक ३१.०३.२०२५ रोजी (चंद्र दर्शनानुसार ०१ दिवस पुढे मागे) रमजान ईद साजरी होणार आहे.

नयानगर पोलीस ठाण्यात मिश्र हिंदु - मुस्लिम लोकवस्ती असुन सदरचा सण शांततेत पार पडावा याकरीता नयानगर पोलीस ठाण्याकडुन आज दिनांक २७.०२.२०२५ रोजी दुपारी १५.३० ते १७.०० वा चे दरम्यान रसाज इंटरनॅशनल स्कुलचे हॉलमध्ये बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस शांतता कमिटी सदस्य ,मोहल्ला कमिटी सदस्य , हद्दीतील मस्जिद मदरसांचे ट्रस्टी व मौलाना तसेच इतर प्रतिष्ठीत नागरीक असे एकुण ११० ते ११५ जनसमुदाय उपस्थित होता.

उपस्थितांना रमजान सणाचे अनुषंगाने खालील प्रमाणे सुचना देण्यात आल्या.

१) रमजान सणाचे अनुषंगाने रहदारीच्या ठिकाणी वाहतुक कोंडी होवुन नये याकरीता वाहतुक नियंत्रण करीता मा. पोलीस उप आयुक्त, मुख्यालय,मि. भा. व. वि. यांचेकडुन पारीत झालेल्या वाहतुक नियंत्रण अधिसुचनेची विस्तृत माहीती देण्यात आली.

२) वाहतुक नियंत्रण अधिसुचनेच्या अनुषंगाने वाहतुकीसाठी करण्यात आलेले पर्यायी रस्ते व पार्किंगबाबतची माहीती देण्यात आली.

३) हॉकर्स व भिकारी यांचेवर महापालिकेच्या मदतीने कारवाई करीत असल्याची माहीती दिली.

४) सुरक्षिततेच्या दृष्टीने मस्जिद/मदरसां मधील सीसीटीव्ही कॅमेरे सुस्थितीत असल्याबाबत खात्री करणेबाबत सुचना देण्यात आल्या.

तसेच सदर सणाच्या अनुषंगाने घ्यावयाची दक्षता, ध्वनी प्रदुषण, सोशल मिडीयावरील अफवांवर विश्वास न ठेवण्याबाबत, तसेच काही तक्रार अथवा अडचण असल्यास त्वरीत पोलीस विभागाशी संपर्क करण्याच्या सुचना देण्यात आल्या.

सदर बैठकीत उपस्थित जनसमुदायास मा. श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -०१, मिरारोड, मा. श्री. विवेक मुगळीकर, सहा. पोलीस आयुक्त, नवघर विभाग, नवघर तसेच नयानगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अमर जगदाळे यांनी संबोधित करुन सदरचा सण कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु न देता शांततेत पार पाडण्याचे आवाहन करण्यात आले.